**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>**

महानगरपालिकेच्या बुधवार, दिनांक 22/02/2017 रोजी भरलेल्या माहे जुलै महिन्याची सर्वसाधारण तहकुब सभेत (मुळ सभा 20 जुलै 2016)मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 17.**<br>**दिनांक 20 जुलै 2017** | नमुंमपा etc उप केंद्र सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/07/2016 चे पत्र क्र.नमुंमपा/etc अशिप्रसेकें/816/2016. |
| **<u>ठराव क्र. 1337.</u>**<br>**दिनांक 22 फेब्रुवारी 2017** | "नवी मुबंई महानगरपालिका etc उप केंद्र सुरु करण्यासाठी प्रस्तावातील नमुद करण्यात आलेला **<u>मुददा क्र. 7 मधील प्रस्तावित बार्बीमधील बाब क्र.</u>** (1) नमुंमपा etc केंद्राच्या उपकेंद्राकरीता नमुंमपा क्षेत्रामधील ठिकाण निश्चित करुन भुखंड अथवा इमारत उपलब्ध करुन देण्यास, व **<u>बाब क्र.</u>** (2) दिव्यांग मुलांची प्रवेश संख्या व नियमावली निश्चित करण्यास, आणि **<u>बाब क्र.</u>** 3 ते 6 वगळण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम 66 (1,42) अन्वये, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>उपसूचनेसह मंजूर.</u>** |
| **विषय क्र. 18.**<br>**दिनांक 20 जुलै 2017** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गाच्या पदनिमिर्ती करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/07/2016 चे पत्र क्र.नमुंमपा/प्रशा/आस्था-1/प्र.क्र.388/3217 /2016. |
| **<u>ठराव क्र. 1338.</u>**<br>**दिनांक 22 फेब्रुवारी 2017** | “प्रस्तृत विषय सभेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने **<u>फेरविचारार्थ आयुक्तांकडे परत</u>** पाठविण्यात यावा." |
| **निर्णय -** | **<u>आयुक्तांकडे परत</u>** |
| **विषय क्र. 19.**<br>**दिनांक 20 जुलै 2017** | नेरुळ से. 50 येथील शाळा इमारत अपंग शिक्षण प्रशिक्षण केंद्रासाठी(e.t.c.) देण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/1839/2016. |
| **<u>ठराव क्र. 1339.</u>**<br>**दिनांक 22 फेब्रुवारी 2017** | “नवी मुंबई महानगरपालिकेच्या नेरुळ, सेक्टर 50 येथील शाळा इमारत महानगरपालिकेच्या अंपग शिक्षण प्रशिक्षण केंद्रासाठी (etc) वापर करण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम 79 अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजूरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>नामंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 20.**<br>**दिनांक 20 जुलै 2017** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरीता आवश्यक मेडीकल गॅस सिलेंडर्स कंत्राटी पध्दतीने पुरवठा करणेच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/पुरकसेवा-11/4208/2016. |
| **<u>ठराव क्र. 1340.</u>**<br>**दिनांक 22 फेब्रुवारी 2017** | “नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरीता आवश्यक मेडिकल गॅस सिलेंडर्स कंत्राटी पध्दतीने पुरवठा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह वार्षिक अपेक्षित खर्च रु. 86 लक्ष, 31 हजार, 348 मात्र व दोन वर्षाकरीता रु. 1 कोटी, 72 लक्ष, 62 हजार, 696 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 21.**<br>**दिनांक 20 जुलै 2017** | घणसोली कार्यक्षेत्रातील नमुंमपा टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील शिवाजी फलोअर मिल येथुन ऐरोली टी जंक्शन येथे जाण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ/721/2016. |
| **<u>ठराव क्र. 1341.</u>**<br>**दिनांक 22 फेब्रुवारी 2017** | “घणसोली कार्यक्षेत्रातील नमुंमपा टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील शिवाजी फ्लोअर मिल येथुन ऐरोली टी जक्शंन येथे जाण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रु. 10 कोटी, 40 लक्ष, 45 हजार, 950 मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार देय असलेल्या भाववाढीच्या रक्क्मेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 22.**<br>**दिनांक 20 जुलै 2017** | नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सर्व रुग्णालयांकरीता सन 2016-2017 करीता आवश्यक पॅथॉलॉजी साहित्य व जनरल सर्जिकल साहित्य खरेदी करणेकरीता एकत्रित प्रशासकिय मान्यता मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/4350/2016. |
| **<u>ठराव क्र. 1342.</u>**<br>**दिनांक 22 फेब्रुवारी 2017** | “नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सर्व रुग्णालयांकरीता सन 2016-17 सालाकरीता आवश्यक असलेली सर्जिकल साहित्य खरेदी करणेस अपेक्षित खर्च रु. 4 कोटी, 3 लक्ष, 87 हजार 490 मात्र व पॅथॉलॉजी साहित्य खरेदी करणेस उपेक्षित खर्च रु. 3 कोटी, 70 लक्ष 44 हजार 64 मात्र असे एकूण रु. 7 कोटी, 74 लक्ष, 31 हजार, 554 मात्र इतक्या खर्चास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह यांस व त्यानुसार निविदा प्रक्रिया करणेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 23.**<br>**दिनांक 20 जुलै 2017** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये सोनोग्राफी व क्ष-किरण सुविधा बाहयंयंत्रणेदवारे (outsorcing) कंत्राटी पध्दतीने पुरविणेकरीता प्रशासकिय मान्यता मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/पुरक सेवा-11/4356/2016. |
| <u>**ठराव क्र. 1343.**</u><br>**दिनांक 22 फेब्रुवारी 2017** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयामध्ये सोनोग्राफी व क्ष-किरण सुविधा बाहययंत्रणेद्वारे (outsourcing) कंत्राटी पध्दतीने पुरविणेकरीता प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह अपेक्षित वार्षिक खर्च रु. 5 कोटी, 85 लक्ष, 65 हजार, 659 मात्र व दोन वर्षाकरीता रु. 11 कोटी, 71 लक्ष, 31 हजार, 318 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | <u>**मंजूर**</u> |
| **विषय क्र. 24.**<br>**दिनांक 20 जुलै 2017** | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कामगीरी आधारीत बाहय यंत्रणेव्दारे डास अळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरणाचे नागरी आरोग्य केंद्र निहाय कामे करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/हिवताप/4372/2016. |
| <u>**ठराव क्र. 1344.**</u><br>**दिनांक 22 फेब्रुवारी 2017** | "नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डास अळी नाशक फवारणी व रासायनिक धुरीकरणाची कामे 21 नागरी आरोग्य केंद्रनिहाय बाहययंत्रणेद्वारे कामगीरी व उद्दिष्टांवर आधारीत, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह या प्रणाली नुसार करण्याच्या अपेक्षित वार्षिक खर्च रु. 8 कोटी, 64 लक्ष, 32 हजार, 310 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | <u>**मंजूर**</u> |
| **विषय क्र. 25.**<br>**दिनांक 20 जुलै 2017** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मालमतांचे Light detection and ranging (LiDAR) Technology वापरुन सर्वेक्षण करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/का.अ.वि/488/2016. |
| <u>**ठराव क्र. 1345.**</u><br>**दिनांक 22 फेब्रुवारी 2017** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे Light Detection and Ranging (LiDAR) Technology वापरुन सर्वेक्षण करणेकरीता प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 20 कोटी मात्र इतक्या खर्चास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 73(क) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | <u>**स्थगित**</u> |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 26.**<br>**दिनांक 20 जुलै 2017** | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सन 2016 ते 2019 या तीन वर्षाच्या कालावधीसाठी मुषक नियंत्रणाचे काम करण्यास प्रशासकिय मान्यता मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/ आरोग्य/4389/2016. |
| **<u>ठराव क्र. 1346.</u>**<br>**दिनांक 22 फेब्रुवारी 2017** | “नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सन 2016 ते 2019 या तीन वर्षाच्या कालावधीसाठी मुषक नियंत्रणाचे काम करण्यासाठी ‘मुषक नियंत्रण’ या लेखाशिर्षाखाली अंदाजे वार्षिक रु. 219.43 लक्ष (तीन वर्षाकरीता एकत्रित रु. 658.30 लक्ष) खर्च अपेक्षित धरुन उपरोक्ताप्रमाणे मुषकनाशके व इतर साधनसामुग्री पुरविणे या कामासह उद्दिष्ट आधारीत मुषक नियंत्रणाचे काम तीन वर्षाच्या कालावधीकरीता करण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 73(क) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

## महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी

**माहे जुलै 2016 ची सर्वसाधारण सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **सौ. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 56, कोपरीगावमध्ये ग्रामपंचायत कालीन सांस्कृतिक भवन आहे. परंतू ते मोडकळीस आले आहे. सदर भवनाचा उपयोग होत नाही. ते पडीक स्थितीत आहे. तरी सदर सांस्कृतिक भवनाची सुधारणा करणे. | 27 / जुलै | 1347 / 22/02/2017 | मंजूर |
| 2. | **सौ. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 56, कोपरीगावमध्ये ग्रामपंचायत कालीन असलेल्या स्मशानभुमीला पुर्ण संरक्षण भिंत नाही. स्मशानभुमीची एक बाजू उघडी असल्यामुळे लहान मुले तेथे खेळत असतात. काही लोक मदयपान करीत असतात. तर काही लोक आसन व्यवस्थेच्या शेडखाली झोपलेली असतात दिवाबत्ती किंवा पाण्याची देखील सोय नाही. काही विपरीत अनर्थ घडण्या अगोदर स्मशानभुमीच्या एका बाजूची संरक्षण भिंत बांधावी तसेच जून्या भिंतीची उंची वाढवावी व स्मशानभूमीची सुधारणा करणे. | 28 / जुलै | 1348 / 22/02/2017 | मंजूर |
| 3. | **सौ. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 56, कोपरीगावमध्ये ग्रामपंचायत कालीन मच्छी व भाजी मार्केट असून सदर मार्केटची दुरावस्था झाली आहे. सदर मार्केटमध्ये पाण्याची व विजेची (Light) सोय नाही. तसेच मार्केट कोसळण्याच्या स्थितीत आले आहे. तरी सदर मार्केटची सुधारणा करणे. | 29 / जुलै | 1349 / 22/02/2017 | मंजूर |
| 4. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून:-** प्रभाग क्र. 55, कोपखैरणे, से. 11 रेल्वे ट्रक परिसरातील मागील भागात गार्डन नसल्यामुळे लहान मुले, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिलांना कोणत्याही प्रकारचे करमणुकी करता जागा उपलब्ध नाही या प्रभागामधील भुखंड क्र. 34 मधील डेब्रीज साफ करुन त्या ठिकाणी गार्डन तयार करुन त्या ठिकाणी लहान मुलांना खेळण्याकरीता खेळणी, व ज्येष्ठ नागरिकाकरीता आसन व्यवस्था बसविणे | 30 / जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 5. | **श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 110 करावेमध्ये असलेल्या मध्यवर्ती स्मशानभुमीमध्ये प्रदुषण नियंत्रण यंत्रणा बसविणे. साधारणपणे 1995 पर्यंत करावे गावाची लोकसंख्या अंदाजे सहा ते सात हजारापर्यंत होती त्यावेळी सिवूडस (प) म्हणजेच करावे गावाच्या बाजुस सिडको गृहनिर्माण सोसायटी यांचे बांधकाम तसेच इतर खाजगी विकासक व केंद्रिय विहार, एन.आर.आय. कॉम्पलेक्स यासारख्या गृहनिर्माण सोसायटीचे बांधकाम चालू होते. त्या सोसायटीचे बांधकाम पुर्ण होऊन आजमितीस सर्व सिवूडस (प) परिसरातील आपल्या करावे नागरी आरोग्य केंद्राच्या सर्व्हेक्षणानुसार लोकसंख्या 118000 (एक लाख आठरा हजार) एवढी असुन 1995 सालाच्या तुलनेत लोकसंख्या पंधरापटीने वाढली आहे. पुर्वी करावे गावासाठी असलेली स्मशानभुमी ही करावे गावातील निधन झालेल्या व्यक्तीसाठी होती. त्यावेळेस अंदाजे महीन्याला एक ते दोन व्यक्ती निधन पावत होते तसेच सदर स्मशानभुमि ही त्यावेळेस गावाच्या बाहेर म्हणजेच लोकवस्तीच्या बाहेर होती परंतु आता आपल्या विभाग कार्यालयाच्या नोंदणी नुसार करावे गावाच्या स्मशानभुमिमध्ये महीन्याला 20 ते 25 निधन झालेल्या व्यक्तीचे अंत्यविधी करण्यात येते त्यामुळे स्मशानभुमिच्या आजुबाजुच्या परिसरात धुरामुळे मोठया प्रमाणात प्रदुषण होत आहे तरी करावे गावामधील मध्यवर्ती स्मशानभुमिमुळे प्रदुषण नियंत्रण यंत्रणा बसविणे | 31<br>जुलै | 1350<br>22/02/2017 | मंजूर |
| 6. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून:-** प्र. क्र.. 83 जुईनगर येथील मराठी शाळा क्र. 17 मधील विद्यार्थ्यांना शाळेसाठी देण्यात येणारे बुट, रेनकोट शाळा सुरु होताच पहिल्याच महिन्यात दयावेत तसेच संगणकिय देखभाल व शिक्षण विषयक ठेका पुर्ण शैक्षणिक वर्षासाठी दयावा जेणेकरुन मागील वर्षासारखे संगणकिय आभ्यासात ठेका नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. | 32<br>जुलै | 1351<br>22/02/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 7. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून:-**<br>प्र. क्र. 83 जुईनगर येथे दररोज निघणारा कचरा तसेच झाडांच्या फांदया व गटारातील निघालेली घाण उचलली जाते त्याचप्रमाणे दररोज निघणाऱ्या डेब्रिज टाकण्यासाठी प्रभागातच जागा ठरवून पालिकेकडून ठराविक कालावधीत त्या उचलण्याची कार्यप्रणाली ठरवून पुर्ण प्रभाग डेब्रिज मुक्त करण्याची योजना कार्यान्वित करणे | 33<br>जुलै | 1352<br>22/02/2017 | मंजूर |
| 8. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून:-**<br>नमुंमपा तर्फे विधवांसाठी व्यवसायाभिमुख रोजगार व ज्यांचे वय 60 च्या जास्त आहे अशा बेसहारा विधवांना आर्थिक अनुदान चालु करणे. | 34<br>जुलै | 1353<br>22/02/2017 | मंजूर |
| 9. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 12 ऐरोली सेक्टर क्र. 2 या ठिकाणी असलेल्या सिडको कालीन ड्रेनेज सिस्टीम सेक्टर क्र. 2 सी-436 ते सी-444, तक्षशिला बुध्दविहार ते बी-518/1, ममता सोसायटी डी-1 पासून डी-40 पर्यंत तसेच प्रभाग क्र. 12, सेक्टर क्र. 1, ऐरोली रहिवासी सेवा संघ ऑफिस ते हनुमान स्विट मार्ट पर्यंत अतिशय निकृष्ट दर्जाची ड्रेनेज सिस्टीम झालेली असून सदरची ड्रेनेज सिस्टीम नव्याने करणे. | 35<br>जुलै | 1354<br>22/02/2017 | मंजूर |
| 10. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 12 ऐरोली सेक्टर क्र. 2 येथील जनता मार्केट लगत असलेल्या सोसायटयां मधील मैदानामध्ये लहान मुलांना खेळण्यासाठी बॅडमिंटन कोर्ट तसेच अन्य खेळ खेळण्यासाठी मैदानात पी.सी.सी. करुन स्पिच उपलब्ध करणे. | 36<br>जुलै | 1355<br>22/02/2017 | मंजूर |
| 11. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2015-16 मध्ये रक्कम रु.75,00,000/- (अक्षरी पंच्याहत्तर लाख मात्र)रक्कमेची तरतुद आय.ए.एस., आय.पी.एस.स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र उभारण्या-साठी करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत प्रभाग क्र. 12 मधील सेक्टर क्र. 2 मध्ये सावित्रीबाई फुले अभ्यासिका केंद्र लोक सहभागातुन कार्यान्वीत आहे. सदर भुखंडावर व लगतच्या जागेवर प्रशस्त आय.ए.एस.,आय.पी.एस. स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र उभारणेकामी रक्कम रु.75,00,000/- (अक्षरी पंच्याहत्तर लाख मात्र) रक्कम उपरोक्त ठिकाणी व जागेसाठी राखीव ठेवणे. | 37<br>जुलै | 1356<br>22/02/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 12. | **श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 53 जुहूगाव नोड-1 येथील झेड पी रोडची फार दुरावस्था झाली आहे. गेली आठ ते नऊ वर्षे या रोडचे डांबरीकरण झाले नाही. आपण जातीने पहाणी करुन या रोडचे डांबरीकरण करणे | 38<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 13. | **श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 53 जुहूगाव नोड-1 येथील झेड पी रोडला असलेल्या गटाराची खोली वाढवून हेवी आर.सी.सी. गटर बनविण्यात यावे. जेणे करुन रोडची रुंदी वाढुन येणा-या वाहनांना अडचन होणार नाही | 39<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 14. | **श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.53 जुहूगाव नोड-1 येथील सेक्टर 12 मधील मेन रोडला असलेल्या फुटपाथचे बऱ्याच वर्षापासुन दुरुस्तीचे काम झाले नाही तरी या फुटपाथची सुधारणा व दुरुस्ती करणे | 40<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 15. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 82 सेक्टर 25 जुईनगर येथील अमृता विद्यालय ते आनंदवन सोसायटी दरम्यान असलेले फुटपाथ हेवी डयुटीचे स्लॅब टाकुन व दुरुस्ती करणे. | 41<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 16. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.82 सेक्टर 24 जुईनगर पौरसछाया येथे निवारा शेड बांधणे | 42<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 17. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.82 सेक्टर 24 जुईनगर सुंदरम सोसायटी ते वैभव सोसायटी पर्यंतच्या गटारांच्या झाकणांची दुरुस्ती करणे | 43<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 18. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून:-**<br>प्रभाग क्र.59, सेक्टर 11, जुहूगाव, येथील वेलकम स्टोअर्स ते गौरी निवास व कोळीनताई निवास ते आनंदभवन निवास येथे नवीन मलनिस:रण वाहिनी टाकणे. | 44<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 19. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून:-**<br>प्रभाग क्र.59, सेक्टर 11, जुहूगाव, येथील शालीक नाखवा बिल्डींग ते कुसुम निवास येथील फुटपाथची दुरुस्ती करुन तेथे इंटरलॉक बसविणे. | 45<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 20. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून:-**<br>प्रभाग क्र.59, सेक्टर 11, जुहूगाव, येथील गावदेवी मैदानाजवळ बंद असलेले सुलभ शौचालय तोडून तेथे व्यायामशाळा व वाचनालयासाठी बहुऊद्देशीय इमारत बांधणे. | 46<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 21. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 51, कोपरखैरणे, सेक्टर 13, भुखंड क्र. 11 येथील INDOOR RECREATION साठी राखीव असलेल्या भुखंडावर समाज उपयोगी समाजमंदीर बांधणे. | 47<br>जुलै | 1357<br>22/02/2017 | मंजूर |
| 22. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 51, कोपरखैरणे, सेक्टर 12A, स्मशानभुमीच्या मागील बाजुची मोकळी जागा आहे. तिचा सर्व्हे करुन विभागातील गरजू व गरीब लोकांसाठी तेथे भाजीपाला व्यवसायासाठी ओटले काढणे. | 48<br>जुलै | 1358<br>22/02/2017 | मंजूर |
| 23. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 51, सेक्टर 12A, इडन पार्क ते कॉर्पोरेशन बँक आणि नुतन सरोवर ते चिंतामणी सोसायटी पर्यंत पेव्हर ब्लॉक बदलणे. | 49<br>जुलै | 1359<br>22/02/2017 | मंजूर |
| 24. | **सौ. सायली नारायण शिंदे, यांजकडून:-**<br>प्रभाग क्र. 37, अंतर्गत येणाऱ्या टिंबर मार्केट, सेक्टर 1A, कोपरखैरणे येथील नाल्याची नव्याने दुरुस्ती करणे. | 50<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 25. | **सौ. सायली नारायण शिंदे, यांजकडून:-**<br>प्रभाग क्र. 37, अंतर्गत प्रभागातील दुरुस्ती व गरज असल्यास नवीन पदपथ करणे. | 51<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 26. | **सौ. सायली नारायण शिंदे, यांजकडून:-**<br>प्रभाग क्र. 37, अंतर्गत येणारे मिनी मार्केट सेक्टर 1 याची नव्याने बांधणी करणे. | 52<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 27. | **श्री. विजय लक्ष्मण चौगुले, यांजकडून:-**<br>मुंबई महानगरपालिका मा. स्थायी समिती द्वारा सन 2000 नंतरच्या झोपडयांना नळ कनेक्शन देण्याच्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निर्णय घेण्यात आला आहे. त्याच धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडयांना नळ कनेक्शन मिळाणे. | 53<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 28. | **सौ. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 76, च्या उड्डाण पुलाखाली मोकळया जागेत ओपन जिम, जेष्ठ नागरीक कट्टा, खुले वाचनालय इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणे. | 54<br>जुलै | 1360<br>22/02/2017 | मंजूर |
| 29. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>घणसोली गाव यात प्रभाग क्र. 29,30,31 हे पुर्ण प्रभाग येत आहेत. तसेच प्रभाग क्र. 27,28,32 हे अर्धे प्रभाग घणसोली गावात येतात. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात असणाऱ्या प्रभागाची लोकसंख्या अंदाजे 70 ते 80 हजार आहे. कित्येक महिन्यापासून येथील विजपुरवठा सतत खंडीत होत असल्यामुळे येथील नागरीकांना घरगुती विजेच्या समस्येचा त्रास सहन करावा लागत आहे. मागील महिन्यापासून दिवसा व रात्री सुध्दा विज सतत जात आहे. घणसोली गावासाठी विज पुरवठा नियमीत होण्यासाठी "स्वतंत्र सबस्टेशनची" आवश्यकता आहे. व हे स्वतंत्र सबस्टेशन बांधण्यासाठी 3,000 sqm.(तीन हजार स्क्वेअर मीटर) जागेची आवश्यकता आहे. व त्यासाठी सिडको प्राधिकरणाकडून जागेची मागणी करणे गरजेचे आहे. तरी नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून सिडको प्राधिकरणाकडे 3,000 sqm. (तीन हजार स्क्वेअर मीटर) जागेची मागणी घणसोली गावासाठी स्वतंत्र सबस्टेशन बनविण्यासाठी करण्यात यावी. व लवकरात लवकर घणसोली गावासाठी M.S.E.B. कडून स्वतंत्र सबस्टेशन तयार करुन घेवून विद्युत पुरवठयाची हि समस्या दूर करणे. | 55<br>जुलै | 1361<br>22/02/2017 | मंजूर |
| 30. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**<br>ठाणे महानगरपालिकेने अभय योजने अंतर्गत मागणी करेल त्याला पाणी योजना व मुंबई महानगरपालिकेने दि. 17 जुन 2016 रोजी स्थायी समितीमध्ये सन 2000 पर्यंतच्या घरांना नवीन नळ कनेक्शन देण्याचा ठराव मंजूर केला आहे त्याप्रमाणे नवी मुंबईतही मागेल त्याला नळ कनेक्शन किंवा सन 2000 पर्यंतच्या घरांना नवीन नळ कनेक्शन देण्यात | 56<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 31. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर ते वाशी रेल्वे स्थानक (महापे MIDC) मार्गे परिवहन बस सेवा चालु करणे अत्यंत गरजेचे आहे. सदर प्रभागाजवळ कळवा रेल्वे स्थानक व इंडस्ट्रीयल झोन असल्याने वाशी व MIDC कडे जाणाऱ्या लोकांची गैरसोय होते तरी ईश्वरनगर ते वाशी रेल्वे स्थानक (महापे MIDC) मार्गे परिवहन बस सेवा सुरु करणे. | 57 / जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 32. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील चाळी नियोजीत असल्याने प्रभागात सेवरेज लाईन (मलनिस्सारण वाहिनी ) टाकणे अत्यंत सुलभ जाणार असुन शासनाने व केंद्र सरकारने स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत घरोघरी शौचालय बांधणे करीता अनुदान उपलब्ध केल्याने जवळ जवळ संपुर्ण प्रभागात घरोघरी शौचालय बांधले गेले असल्याने प्रभागात सेवरेज लाईन (मलनिस्सारण वाहिनी ) टाकण्यात | 58 / जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 33. | **श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-** प्रभाग क्र. 23, सेक्टर 9 व 10 ऐरोली, येथील मलनिस:रण वाहिनींची दुरुस्ती करणे. | 59 / जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 34. | **श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-** प्रभाग क्र. 23, सेक्टर 10 ऐरोली, येथील पाण्याच्या टाकी शेजारील मैदानालगत असलेल्या पावसाळी गटाराचे नुतनीकरण करणे. | 60 / जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 35. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 95, बांचोली मैदानाच्या बाजुला मिनी हाय-मास्ट लावणे. | 61 / जुलै | 1362 / 22/02/2017 | मंजूर |
| 36. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 95, नेरुळगाव येथे दिशादर्शक फलक बसविणे. | 62 / जुलै | 1363 / 22/02/2017 | मंजूर |
| 37. | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 48, श्रमिकनगर खैरणे येथील MIDC महानगरपालिकेस दिलेले भुखंड क्र. OC'2 A ब्लॉक वर मैदान व बगीचा विकसीत करणे. | 63 / जुलै | 1364 / 22/02/2017 | मंजूर |
| 38. | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 48, कातकरीपाडा खैरणे येथील अदिवासी कातकरी रहिवाश्यांसाठी घरकुल योजना राबविणे. | 64 / जुलै | 1365 / 22/02/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 39. | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 48, पावणेगांव येथील सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारांची पुर्णबांधणी करणे. | 65 जुलै | 1366 22/02/2017 | मंजूर |
| 40. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, नेरुळ, सेक्टर 16ए, 16 व 18 येथील सर्व गटारांवरील तुटलेली झाकणे हटवून त्या ठिकाणी नवीन झाकणे बसविणे. | 66 जुलै | 1367 22/02/2017 | मंजूर |
| 41. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, सेक्टर 16ए येथील महानगरपालिकेच्या नव्याने बांधत असलेल्या शाळेसमोरील गटार व पदपथाची अवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे व त्यामुळे याचा गैरफायदा घेऊन काही लोक डेब्रीज व कचरा टाकत आहेत. तेथे कचरा व डेब्रीजचे साम्राज्य पसरले आहे. तरी तेथील डेब्रीज व कचरा हटवून सदर ठिकाणी नव्याने गटार व पदपथ बांधणे. | 67 जुलै | 1368 22/02/2017 | मंजूर |
| 42. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96, नेरुळ, सेक्टर 16ए, 16 व 18 मध्ये गटारांची साफसफाई व्यवस्थितरीत्या झाली नसल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे होते. त्यानुसार मी सदर गटारांची पाहणी केली असता गटारातील झाकणाखालील वरवरचा गाळ काढला आहे. तरी आपण सर्व गटरावरील गाळ तळापासून बाहेर काढून लवकरात लवकर उचलणे. | 68 जुलै | 1369 22/02/2017 | मंजूर |
| 43. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, मधील पिपल्स स्कुलच्या मागील मैदानातुन व सेक्टर 9 मधुन येणारे पावसाळी पाणी मोठया वेगाने व मोठया प्रमाणात रस्त्यावर येते पाण्याबरोबर आलेल्या चिखलाने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. सदर ठिकाणी पाहणी करुन पावसाळी गटार बांधणे. | 69 जुलै | 1370 22/02/2017 | मंजूर |
| 44. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, मधील डॉ. आंबेडकर उदयानाजवळील मार्केट ते सी-5/2, सेक्टर 1ए पर्यंत पदपथ तुटलेल्या अवस्थेत आहे. सदर पदपथाची दुरुस्ती करणे. | 70 जुलै | 1371 22/02/2017 | मंजूर |
| 45. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, मधील सी-5/12, 14,15,18 सेक्टर 1ए समोरील 9 पावसाळी गटाराचे कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे त्यावर ॲन्टीस्कीड लादया बसविणे. | 71 जुलै | 1372 22/02/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 46. | **श्रीम. दमयंती बबन आचरे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 43, मधील कै. शिवाजीराव पाटील उद्यान सेक्टर 15 ते 18 या ठिकाणी कै. शिवाजीराव पाटील यांचे स्मारक व्हावे | 72<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 47. | **श्रीम. दमयंती बबन आचरे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 43, मधील मोडकळीस आलेल्या विद्युत खांबाचे नुतनीकरण करणे. | 73<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 48. | **श्रीम. दमयंती बबन आचरे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 43, मधील सेक्टर 17 ते 18 कोपरखैरणे येथील जुन्या व खराब झालेल्या जल वाहिन्या बदलणे. | 74<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 49. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 101, मधील आयकर कॉलनीतील गटारांचे व पावसाचे सांडपाणी वाहून नेणाऱ्या आयकर कॉलनी ते रेल्वे ट्रॅक पर्यंतच्या नादुरुस्त कच्च्या नाल्याचे नुतनीकरण करणे. | 75<br>जुलै | 1373<br>22/02/2017 | मंजूर |
| 50. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>एकता विहार सोसायटी मुख्य गेट नं. 2 व निलगीरी सोसायटीच्या मुख्य गेट बाहेरील पदपथावरील मोकळया जागेत नागरिकांच्या व विशेषत: महिला आणि जेष्ठ नागरीक यांना ऊन-पावसापासुन संरक्षण व विश्रांतीसाठी निवारा शेड बसविणे. | 76<br>जुलै | 1374<br>22/02/2017 | मंजूर |
| 51. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 101, आयकर कॉलनीमधील बिल्डींग क्र. डी. 29,30,32,33 हया इमारती जवळील मलनि:स्सारण वाहिन्या या कमी व्यासाच्या असुन नादुरूस्त आहेत. सदर ठिकाणच्या वाहिन्यांना प्रॉपर स्लोप नाही. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा बरोबर होत नसल्याने सांडपाणी व घाण चेंबरमधून बाहेर येत आहे. परीणामी सदर परिसरामध्ये दुंर्गंधी पसरली आहे त्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. सदर ठिकाणच्या मलनि:स्सारण वाहिन्यांचे ताबडतोब नुतनीकरण करणे. | 77<br>जुलै | 1375<br>22/02/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **52.** | **सौ. अजली अजय वाळुंज, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 62 मध्ये "फायर ब्रिगेड से.16 अ सिग्नल आणि सी /12, 1 ते 10, सेक्टर 16 (जैन मंदिरासमोर) या ठिकाणी दोन्ही कोप-यावर त्याचप्रमाणे "शबरी हॉटेल समोरील, (B/3, 1 ते 12) आणि (B/3 13 ते 26) च्या दोन्ही कोप-यावरील सिग्नल" या दोन्ही ठिकाणी अनावश्यक अत्यंत मोठे फुटपाथ असुन त्या ठिकाणी रस्ता अत्यंत अरूंद आहे. त्यामुळे वाहनांची गर्दी होउन (Bottleneck) कायम येणा जाणा-यांना अडथळा येतो आणि ट्रॅफिक जॅम होते, त्यामुळे त्या ठिकाणी रस्ता रुंदीकरण करणे. | 78<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 53. | **सौ. अजली अजय वाळुंज, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 62 मध्ये सेक्टर 15, 16, 9, 10 ला पाणीपुरवठा करणारे जलकुंभ/ पाण्याची टाकी आहे. परंतू गेल्या कित्येक वर्षापासून त्या ठिकाणी पावसाळयामध्ये शॉर्टसर्किटमुळे आणि पाणीगळतीमुळे वायर्स खराब होवून दोन दोन दिवस पाण्याच्या संकटाला सामोरे जावे लागते आहे. तरी त्या ठिकाणी नवीन खोली बांधण्यात यावी आणि महावितरणाच्या सहायाने सर्व वायर्स त्याचप्रमाणे इलेक्ट्रिक फिटिंग्स नव्याने टाकण्यात यावे. त्याचप्रमाणे अचानक विदयुत पुरवठा गेल्यामुळे पाणीटंचाईला सामोरे जायला नको त्यामुळे न.मुं.म.पा ने जनरेटर सेट स्वत:च्या मालकीचा स्थापित करणे. | 79<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 54. | **सौ. अजली अजय वाळुंज, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 62 मध्ये, नवी मुंबईतील नागरीकांसाठी नाटयप्रेमींसाठी तसेच सामाजिक कार्यक्रमसाठी "विष्णूदास भावे नाटयगृह" ही वास्तू बांधण्यात आलेली आहे. परंतु तेथे असलेल्या असुविधा, गैरसोयी, वॉल कंपाउन्ड, गेट, साउंड सिस्टिम, बसण्याची व्यवस्था, भिंतीचे प्लास्टर, वातानुकुलित यंत्राणा, डांबरीकरण, पार्किंग, दुर्गंधी आणि व्यवस्थापन या सगळयांचा बोजवारा उडला असुन त्यामुळे नाटयकलावंत, प्रेक्षक यांनी पाठ फिरविलेली दिसते तरी, हे आपल्या नवी मुंबईचे मानचिन्ह असुन माननीय आयुक्तांनी स्थानिक नगरसेवकांसोबत या नाटयगृहाला भेट द्यावी आणि ज्या असुविधा असतील त्या दुर करण्याबाबत प्रयत्न करणे. | 80<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 55. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून:-** प्रभाग क्र. 27, अंतर्गत असंघटीत नाका कामगारांचा उन्हा-पावसापासून संरक्षण करण्यासाठी नोसील नाका येथे संरक्षण करणारे सेंटर उभारणे. | 81 जुलै | 1376 22/02/2017 | मंजूर |
| 56. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून:-** प्रभाग क्र. 27, अंतर्गत रस्ते व फुटपाथ यांची दुरूस्ती करुन आवश्यक तेथे नव्याने बांधणे. | 82 जुलै | 1377 22/02/2017 | मंजूर |
| 57. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून:-** प्रभाग क्र. 27, अंतर्गत जुन्या गटारांची दुरूस्ती करून आवश्यक तेथे नवीन गटारे बांधणे. | 83 जुलै | 1378 22/02/2017 | मंजूर |
| 58. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई येथे ऐरोली, सिवुड, बेलापूर येथे अग्निशमन केंद्र चालवीली जात आहेत. त्याचबरोबर वाढती लोकसंख्या लक्षात घेता कोपरखैरणे येथे अग्निशमन केंद्र उभारले जात आहे. घणसोली विभागामध्ये एकही अग्निशमन केंद्र नाही सुरक्षिततेच्या दृष्टीने, वाढती लोकसंख्या लक्षात घेता घणसोली विभागामध्ये अग्निशमन केंद्र उभारणे. | 84 जुलै | 1379 22/02/2017 | मंजूर |
| 59. | **सौ. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 47 मधील कै.आण्णासाहेब पाटील उदयान सुशोभिकरण करणे | 85 जुलै | 1380 22/02/2017 | मंजूर |
| 60. | **सौ. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 47 मधील सेव्हरेज लाईन (मलनि:सारण वाहिन्या) बदलणे. | 86 जुलै | 1381 22/02/2017 | मंजूर |
| 61. | **सौ. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 47 मधील कै. आण्णासाहेब पाटील उदयानात बहुउददेशीय इमारत बांधणे. | 87 जुलै | 1382 22/02/2017 | मंजूर |
| 62. | **श्रीम. भारती मंगळया कोळी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 105 दिवाळे मधील सर्व सोसायटीचे असलेले रेडीयमचे फलक रस्त्याच्या कडेने बसविणे. | 88 जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 63. | **श्रीम. भारती मंगळया कोळी, यांजकडून :-** दिवाळे गावातील समाजमंदिर तोडून सुसज्य असे नविन बनविणे. | 89 जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 64. | **श्रीम. भारती मंगळया कोळी, यांजकडून :-**<br>दिवाळे गावातील मुख्य नाल्याची अवस्था अतिशय खराब आहे. सांडपाण्याचा निचरा होत नाही. तरी सदरच्या नाल्याची सुधारणा करणे. | 90<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 65. | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>महापालिका क्षेत्रातील मुख्य चौकांमध्ये मोठया स्क्रीन बसवुन त्या व्दारे शहरातील नागरिकांना महापाकलका क्षेत्रातील उल्लेखनीय बाबी, योजना, सुचना, जनजागृती या करिता वापरात आणणे. | 91<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 66. | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील महापालिका शाळा डिजीटल करणे. | 92<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 67. | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>शहरातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून शहरातील मुख्य चौकांमध्ये सीसीटीव्ही कॉमेरे लावण्यात आले आहेत त्याचप्रमाणे अंतर्गत रस्ते, छोटे चौक येथेही सीसीटीव्ही यंत्रणा लावणे. | 93<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 68. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 85, कुकशेत गाव, भूखंड क्र. पी-5 समोरील रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे, तसेच प्रवेशव्दारासमोर स्पीडब्रेकर उभारणे. | 94<br>जुलै | 1383<br>22/02/2017 | मंजूर |
| 69. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 85, कुकशेत गाव, नवी मुंबई महानगरपालिका शाळेमध्ये शिक्षकांची नियमानुसार पूर्तता करणे. | 95<br>जुलै | 1384<br>22/02/2017 | मंजूर |
| 70. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 85, पामबीच सर्व्हिस रोडलगत असणारी गटारे बंधिस्त करुन त्यावर जॉगिंग ट्रॅकची निर्मिती करणे. | 96<br>जुलै | 1385<br>22/02/2017 | मंजूर |
| 71. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 86, सारसोळे ग्रामस्थंकरीता पामबीचलगत जेट्टीची बांधणी करणे. | 97<br>जुलै | 1386<br>22/02/2017 | मंजूर |
| 72. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 86, सारसोळे गावातील नवी मुंबई महानगरपालिका शाळेच्या इमारतीची डागडुजी करण्यात यावी तसेच अदयावत प्रवेशव्दार बांधणे. | 98<br>जुलै | 1387<br>22/02/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 73. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 86, सेक्टर 6 येथील उदयानांची सुधारणा करण्यात यावी तसेच जेष्ठ नागरिकांकरीता विरंगुळा केंद्र बांधणे. | 99<br>जुलै | 1388<br>22/02/2017 | मंजूर |
| 74. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, रुम नं. 998 ते 1000 समोर जेष्ठ नागरिक निवारा शेड तयार करणे. | 100<br>जुलै | 1389<br>22/02/2017 | मंजूर |
| 75. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे बस डेपोची झालेली दुरावस्था पाहता सदर बस डेपोचे सुशोभिकरण करणे तसेच तेथील वास्तुचे नुतनीकरण करणेबात तसेच कोपरखैरनेचे बस स्थानकास प्रवेशव्दार बनविणे. | 101<br>जुलै | 1390<br>22/02/2017 | मंजूर |
| 76. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील सर्व पदपथ दुरुस्त करणे तसेच सर्व पावसाळी गटारे दुरुस्ती करणे. | 102<br>जुलै | 1391<br>22/02/2017 | मंजूर |
| 77. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 84 नेरुळ, येथील सेक्टर 4 स्मशानासमोरील नाला पुर्णपणे खराब झालेला असुन त्या ठिकाणी अर्ध्याच नाल्याचे काम झाले आहे तरी तो नाला पुर्ण करुन लोकांना सुविधा देणे. | 103<br>जुलै | 1392<br>22/02/2017 | मंजूर |
| 78. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 84 नेरुळ, अंतर्गत सेक्टर 2 मध्ये असलेल्या उदयानाची कंपाऊड व ग्रील सुधारणा करणे. | 104<br>जुलै | 1393<br>22/02/2017 | मंजूर |
| 79. | **श्री. जयवंत दत्तात्रय सुतार, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये तात्कालीन युती सरकार 1995 रोजी विविध संस्था, महिला मंडळ यांस झुणका भाकर केंद्र वाटप करण्यात आल होते. सदर योजना ही 2002 रोजी बंद झाली. तेव्हापासून ते आजपर्यंत झुणका भाकर केंद्र सुरु होते. परंतु सदर झुणका भाकर केंद्र हे महापालिकेच्या मालमत्ता विभागाने सील केलेले आहेत. ठाणे महानगरपालिका व मुंबई महानगरपालिकाने स्तरावर धोरण घेऊन भाकर केंद्र त्याच संस्थांना वेगळया योजनेअंतर्गत सुरु ठेवलेले आहेत. आताच मा. मुख्यमंत्र्यांनी सदर झुणका भाकर केंद्र अन्नदाता आहार योजना कक्षामध्ये आणण्याचा मनोदय व्यक्त केलेला आहे. ज्याप्रमाणे ठाणे व मुंबई महापालिकेने जे धोरण घेतले आहे, त्यानुसार महापालिकेने धोरण घेऊन त्यांच संस्थांना व चालकांना झुणका भाकर केंद्र चालण्यास देणे | 105<br>जुलै | 1394<br>22/02/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 80. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** प्रभाग क्र. 108 मधील नवीन शाळेमध्ये लोकांच्या मागणीनुसार सीबीएससी (cbsc) पाठयक्रम अंतर्गत अत्याधुनिक शाळा सुरु करणे. | 106 / जुलै | 1395 / 22/02/2017 | मंजूर |
| 81. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** प्रभाग क्र. 108 मध्ये फुटपाथावरील अतिक्रमण कमी होण्याकरीता नवीन भाजीमार्केट उभारणे. | 107 / जुलै | 1396 / 22/02/2017 | मंजूर |
| 82. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** प्रभाग क्र. 108 मधील उदयान आणि मैदानात साचलेले पावसाचे पाणी बाहेर जाण्याकरिता नवीन बंदिस्त गटार बनविणे. | 108 / जुलै | 1397 / 22/02/2017 | मंजूर |
| 83. | **सौ. वैजयंती दशरथ भगत, यांजकडून :-** नवी मुंबईमध्ये वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून वाहने उभी करण्यासाठी वाहनांच्या प्रमाणात वाहनतळे अपुरी पडत आहेत परिणामी नागरिक त्यांची वाहने रस्त्यावरच उभी करतात. वाहने रस्त्यावर कुठेही उभी केल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी होते तसेच वाहतुक पोलिसांकडून त्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते. हयाकरीता वाहने उभी करण्यासाठी नवीन जागांचा पर्याय शोधणे काळाची गरज आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता महानगरपालिकेचे असे ठाम मत आहे की मनोरंजन मैदान/खेळाचे मैदान (आर जी/पी जी) हया उद्दीष्ठासाठी आरक्षित भूखंडाच्या ठिकाणी भुमिगत वाहनतळे उभारणे. | 109 / जुलै | 1398 / 22/02/2017 | मंजूर |
| 84. | **सौ. रुपाली निशांत भगत, यांजकडून :-** नवी मुंबईमध्ये वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून वाहने उभी करण्यासाठी वाहनांच्या प्रमाणात वाहनतळे अपुरी पडत आहेत परिणामी नागरिक त्यांची वाहने रस्त्यावरच उभी करतात. वाहने रस्त्यावर कुठेही उभी केल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी होते तसेच वाहतुक पोलिसांकडून त्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते. हयाकरीता वाहने उभी करण्यासाठी नवीन जागांचा पर्याय शोधणे काळाची गरज आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता महानगरपालिकेचे असे ठाम मत आहे की मनोरंजन मैदान/खेळाचे मैदान(आर जी/पी जी) हया उद्दीष्ठासाठी आरक्षित भूखंडाच्या ठिकाणी भुमिगत वाहनतळे उभारणे. | 110 / जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 85. | **श्रीम. फशीबाई करसन भगत, यांजकडून :-** नवी मुंबईमध्ये वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून वाहने उभी करण्यासाठी वाहनांच्या प्रमाणात वाहनतळे अपुरी पडत आहेत परिणामी नागरिक त्यांची वाहने रस्त्यावरच उभी करतात. वाहने रस्त्यावर कुठेही उभी केल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी होते तसेच वाहतुक पोलिसांकडून त्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते. हयाकरीता वाहने उभी करण्यासाठी नवीन जागांचा पर्याय शोधणे काळाची गरज आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता महानगरपालिकेचे असे ठाम मत आहे की मनोरंजन मैदान/खेळाचे मैदान (आर जी/पी जी) हया उद्दीष्ठासाठी आरक्षित भूखंडाच्या ठिकाणी भुमिगत वाहनतळे उभारणे. | 111<br>जुलै | 22/02/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

सही/-

**महापालिका सचिव**

**नवी मुंबई महानगरपालिका**